# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांद्वारे पुलावरुन नाल्यामध्ये
**{प्रकल्प विभाग}** कचरा टाकण्यात येतो. त्यामुळे नाल्याच्या प्रवाहात बाधा निर्माण होवून पावसाळयात नागरी वस्तीमध्ये पाणी जमा होवून आर्थिक व मानवी नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारावर आळा घाल्याकरीता नागपूर शहरातील झोन क्रं. 1 ते 10 मध्ये विविध ठिकाणी नदी नाल्याच्या पुलावर लोखंडी जाळी बसविण्याचे एकुण 10 कामाचे प्राकलणास मा. आयूक्त यांनी दि. 22/02/2024 रोजी रु. 380.08 लक्ष राशीला मंजुरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरीता रु. 380.08 लक्ष राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर .

टिप:- 1) प्रस्तृत कामाकरीता येणारा खर्च घनकचरा विभागा अंतर्गत पद क्रं. A24001220301 मनपा निधीतुन करण्यात येईल.

2) सदर कामाकरीता मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

3) सदर कामाकरीता सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

4) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 782/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 24/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांद्वारे पुलावरुन नाल्यामध्ये कचरा टाकण्यात येतो. त्यामुळे नाल्याच्या प्रवाहात बाधा निर्माण होवून पावसाळयात नागरी वस्तीमध्ये पाणी जमा होवून आर्थिक व मानवी नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारावर आळा घाल्याकरीता नागपूर शहरातील झोन क्रं. 1 ते 10 मध्ये विविध ठिकाणी नदी नाल्याच्या पुलावर लोखंडी जाळी बसविण्याचे एकुण 10 कामाचे प्राकलणास मा. आयूक्त यांनी दि. 22/02/2024 रोजी रु. 380.08 लक्ष राशीला मंजुरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरीता रु. 380.08 लक्ष राशीला प्रशासकीय मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.